# महाराष्ट्र शासन

दुरध्वनी क्रमांक. २२७९ ३१०१
फॅक्स क्र:२२८४६९७४
Emailadd:jalseven@rediffmail.com
jalseven.wc@gmail.com

क्रमांक - गपावि - २०१५/प्र.क्र.१२९ / जल- ७
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक - ३० एप्रिल,२०१५

प्रति,

आयुक्त (कृषि),
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : जलयुक्त शिवार अभियान
गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत सुकाणू समितीची अट शिथिल करणेबाबत.

महोदय,

राज्यातील अपूर्ण पाणलोट, गतिमान पध्दतीने पूर्ण करण्याचा धडक कार्यक्रम सन २००७-०८ पासून राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाअंतर्गत ५०० ते १००० हेक्टर क्षेत्र असेलेले ५०% पेक्षा जास्त काम पूर्ण झालेले अपूर्ण पाणलोट, सुकाणू समितीच्या मान्यतेने निवडण्यात येतात. सदर पाणलोटांना TSP, OTSP, राज्यस्तर, जिल्हास्तर व विशेष घटक योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करुन देण्यात येतो.

२. दि.५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये राज्यात, जलयुक्त शिवार अभियान राबविण्यात येत आहे. सदरचा कार्यक्रम, राज्य शासनाचा Flagship Programme म्हणून जाहिर केलेला आहे. या कार्यक्रमांतर्गत दरवर्षी ५००० गावे टंचाईमुक्त करण्यात येणार आहेत. त्याकरीता सन २०१५- १६ मध्ये ६००० गावे निवडण्यात आली आहेत. ही गावे टंचाई, टँकरने पाणीपुरवठा, DPAP, Over Exployted , इ.निकष विचारात घेऊन, जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील समितीमार्फत निवडण्यात आलेली आहेत. या अभियानामध्ये निवडण्यात आलेली गावे मार्च,२०१६ अखेर विकसित करावयाची आहेत. त्यामुळे जून अखेर पर्यन्त पाणलोटाची कामे पूर्ण होणे आवश्यक आहे. गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत जलयुक्त शिवार अभियानात निवडलेल्या गावांतील सूक्ष्म पाणलोटांना निधी उपलब्ध करुन द्यावयाचा आहे. परंतु सदर पाणलोट, सुकाणू समितीने मंजूर केलेले नाहीत, म्हणून निधी

उपलब्ध करुन देण्यास अडचणी येत आहेत. जलयुक्त शिवार अभियानांतर्गत टंचाई, टँकरने पाणीपुरवठा, DPAP, Over Exployted हे निकष लावून गावे निवडण्यात आलेली असल्याने, जलयुक्त शिवार अभियानात निवडलेल्या गावातील सूक्ष्म पाणलोटांना गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुन देण्याकरीता सुकाणू समितीच्या पूर्व मान्यतेची अट शिथिल करण्यात येत आहे.

३. हे सूक्ष्म पाणलोट IWMP, RIDF, इत्यादी मेगा पाणलोट विकासाच्या योजनेमध्ये अंतर्भूत असणार नाहीत, याची दक्षता घेण्यात यावी व सदर पाणलोटांना सुकाणू समितीची कार्योत्तर मान्यता घेण्यात यावी.

आपला,

(ना.श्री.कराड)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीकरीता,

१) सर्व विभागीय आयुक्त
२) संचालक,मृद संधारण व पाणलोट व्यवस्थापन,कृषि आयुक्तालय, पुणे.
३) सर्व जिल्हाधिकारी

mail केला
३०/७/१५